**१९७६ पुर्वी अस्तिवात असलेल्या धोरणानुसार तसेच पुनर्वसन अधिनियम १९७६ व १९८६ नुसार पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना वाटप केलेल्या पर्यायी जमिनीचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)**
**शासन निर्णय क्र. आरपीए-२०१९/प्र.क्र २०/र-१,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०७ मार्च, २०१९.

<u>वाचा</u> :- १) महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक-आरपीए-२००४/प्र.क्र.९१/र-१, दि ११.६.२००४
२) महसुल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-आरपीए-२००४/प्र.क्र.९१/र-१, दि ११.१२.२००४

<u>प्रस्तावना :-</u>

सन १९७६ पूर्वी शासनाच्या तत्कालीन धोरणानुसार / स्थायी आदेशानुसार पाटबंधारे प्रकल्पांमुळे प्रकल्पग्रस्त झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी पर्यायी जमिनी वाटप करण्यात आल्या असून अशा जमिनी भोगवटादार वर्ग-२ सत्ताप्रकराने धारण करण्यात येत आहेत. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम - १९७६ मधील कलम १७ नुसार पाटबंधारे व वीजनिर्मिती प्रकल्पासाठी ज्या व्यक्तीची जमिन संपादित करण्यात आली आहे अशा पात्र प्रकल्पबाधित व्यक्तीस पर्यायी जमिनीचे वाटप कलम १८ मध्ये नमूद अटींच्या पुर्तता केल्यानंतर करण्यात आले आहे,अशा पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना वाटप केलेली पर्यायी जमिनी भोगवटादार वर्ग-२ ची असल्यास अशा जमिनीचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये करणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम- १९८६ नुसार केवळ पाटबंधारे प्रकल्पासाठी ज्या व्यक्तीची जमिन संपादित करण्यात आली आहे अशा पात्र प्रकल्पबाधित व्यक्तीस पर्यायी जमिनीचे वाटप कलम १६ मध्ये नमूद अटींच्या पुर्तता केल्यानंतर करण्यात आले आहे,अशा पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना वाटप केलेली पर्यायी जमिनी भोगवटादार वर्ग-२ ची असल्यास अशा जमिनीचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतर करणे बंधनकारक आहे. पुनर्वसन अधिनियम १९७६ व १९८६ नुसार पात्र प्रकल्पबाधित व्यक्तीस त्याचे पुनर्वसन करण्यासाठी पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले आहे. अशा पात्र प्रकल्पबाधित व्यक्तीस वाटप केलेली पर्यायी जमीन भोगवटादार - वर्ग-२ ची असल्यास तिचे रुपांतर भोगवटादार वर्ग-१ मध्ये करुन अशा पर्यायी जमिनीच्या हस्तांतरण व्यवहार करणे अडचणीचे ठरते. अशा प्रकल्पबाधित व्यक्तींचे ख-या अर्थाने पुनर्वसन करण्यासाठी पुनर्वसन करण्याची प्रक्रिया पुर्ण होऊन पुनर्वसन अधिनियम १९७६ व १९८६ मधील उद्देश व हेतू साध्य होईल.

१९७६ पुर्वी अस्तिवात असलेल्या धोरणानुसार तसेच महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम- १९७६, १९८६ नुसार पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना वाटप केलेल्या पर्यायी जमीनवर निर्बंध असल्याने त्यांचे रुपांतर भोगवटादार वर्ग-१ मध्ये करणे आवशयक आहे. १९७६ पुर्वी अस्तिवात असलेल्या धोरणानुसार तसेच तसेच महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम- १९७६, १९८६ नुसार पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना वाटप केलेली पर्यायी जमीनीचे भोगवटादार वर्ग-२ चे रुपांतर भोगवटादार वर्ग-१ मध्ये करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार १९७६ पुर्वी अस्तिवात असलेल्या धोरणानुसार तसेच महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम- १९७६, १९८६ नुसार व असे अधिनियम अस्तित्वात येण्यापूर्वीच्या शासन धोरणानुसार पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना वाटप करण्यात आलेल्या पर्यायी जमिनीचे भोगवटादार वर्ग-२ मधुन भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्यासाठी पुढीलप्रमाणे धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम- १९७६ व महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम- १९८६ नुसार तसेच हे दोन्ही अधिनियम अस्तित्वात येण्यापूर्वी अस्तिवात असलेल्या धोरणानुसार तत्कालीन शासन धोरणानुसार पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना वाटप केलेल्या पर्यायी जमिनीचे भोगवटादार वर्ग-२ चे रुपांतर भोगवटादार वर्ग-१ मध्ये करुन सदर पर्यायी जमिनींवरील हस्तांतरणासंबंधी निर्बंध उठविण्याबाबत विहीत कालमर्यादा व कार्यपध्द्ती निश्चित करण्यात आली आहे व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांकडून खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक-आरपीए-२००४/प्र.क्र.९१/र-१, दि ११.६.२००४ अन्वये ज्या प्रकल्पांना महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम ,१९७६ व १९८६ लागु झाला आहे , त्या प्रकलपांमुळे बाधित झालेल्या पात्र प्रकल्पग्रस्त पुर्वीचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये मोडणारे असतील व त्यांना वाटप केलेली पर्यायी जमीन भोगटादार वर्ग-२ मध्ये मोडणारी असेल तर वाटप झालेल्या दिनांकापासुन दहा वर्षांनी त्याचे रुपांतर भोगवटादार वर्ग-१ मध्ये होईल असा निर्णय घेण्यात आला होता. त्याचप्रमाणे शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए-२००४/प्र.क्र.९१/र-१, दिनांक २४ दिसेंबर २००४ अन्वये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, जुन्या पाटबंधारे प्रकल्पांच्या बाबतीत ज्यांना पुनर्वसन अधिनियम लागू करण्यात आला नव्हता/ असा पुनर्वसन अधिनियम त्यावेळी अस्तित्वातच नव्हता अशा पाटबंधारे प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तास भोगवटादार वर्ग-२ म्हणून जमिनीचे वाटप झाले असल्यास त्याबाबती दिनांक ११ जून २००४ रोजीचा शासन निर्णय लागू राहील. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम ,१९७६ व १९८६ मधील परिशिष्ठ-२ भाग-३ येथे नमूद तरतुदीनुसार ज्या प्रकल्पग्रस्ताची बाधित क्षेत्रातील जमिन संपादित करण्यात आली आहे, असे पात्र प्रकल्पग्रस्त पर्यायी जमिन मिळण्यास पात्र असुन त्याला भोगवटादार वर्ग-२ ची पर्यायी जमीन वटप करण्यात आली असल्यास त्या जमिनीचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरण करण्यासाठी दहा वर्षांची अट काढुन टाकणे आवश्यक असल्याने सदर शासन निर्णय अधिक्रमित येत आहे

२) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम- १९७६ मधील कलम १७ नुसार पाटबंधारे व वीजनिर्मिती प्रकल्पासाठी ज्या व्यक्तीची जमिन संपादित करण्यात आली आहे अशा पात्र प्रकल्पबाधित व्यक्तीस पर्यायी जमिनीचे वाटप कलम १८ मध्ये नमूद अटींच्या पुर्तता केल्यानंतर करण्यात आले आहे, अशा पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना वाटप केलेली भोगवटादार वर्ग-२ ची पर्यायी जमिन भोगवटादार वर्ग-१ मध्ये तात्काळ रुपांतर करण्याबाबतचे आदेश संबंधित तालुक्याचे तहसिलदार यांनी १५ दिवसात निर्गमित करावेत. आवश्यकतेनुसार सदर अधिकार प्रत्यार्पित करु शकतील. सदर आदेशानुसार सात-बारा उता-यामध्ये आवश्यक नोंद तलाठी यांनी १५ दिवसात करावी. यासाठी संबंधीत पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना कोणताही अर्ज करण्याची अगर शुल्क भरण्याची आवश्यकता राहणार नाही.

३) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम-१९८६ मधील तरतुदीनुसार केवळ पाटबंधारे प्रकल्पासाठी ज्या व्यक्तीची जमिन संपादित करण्यात आली आहे अशा पात्र प्रकल्पबाधित व्यक्तीने कलम १६ मध्ये नमूद अटींच्या पुर्तता केल्यानंतर तिला वाटप केलेली भोगवटादार वर्ग-२ ची पर्यायी जमिन भोगवटादार वर्ग-१ मध्ये तात्काळ रुपांतर करण्याबाबतचे आदेश संबंधित संबंधित तालुक्याचे तहसिलदार यांनी निर्गमित करावेत. आवश्यकतेनुसार सदर अधिकार प्रत्यार्पित करु शकतील. सदर आदेशानुसार सात-बारा उता-यामध्ये आवश्यक नोंद तलाठी यांनी १५ दिवसात

करावी. यासाठी संबंधीत पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना कोणताही अर्ज करण्याची अगर रक्कम/ शुल्क/अधिमुल्य भरण्याची आवश्यकता राहणार नाही.

४) १९७६ पुर्वी अस्तिवात असलेल्या तत्कालीन शासनाच्या धोरणानुसार तसेच महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम- १९७६ व १९८६ नुसार पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना वाटप केलेल्या भोगवटादार वर्ग-२ च्या पर्यायी जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याबाबतचे आदेश उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) यांनी निर्गमित करावेत. आवश्यकतेनुसार सदर अधिकार प्रत्यार्पित करु शकतील. सदर आदेशानुसार सात-बारा उता-यामध्ये आवश्यक नोंद तलाठी यांनी १५ दिवसात करावी. यासाठी संबंधीत पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना कोणताही अर्ज करण्याची अगर रक्कम/शुल्क/अधिमुल्य भरण्याची आवश्यकता राहणार नाही.

५) १९७६ पुर्वी अस्तिवात असलेल्या तत्कालीन शासनाच्या धोरणानुसार ज्या भुधारकांनी संपादित जमिनीचा मोबदला प्राप्त झाल्यानंतर पर्यायी जमिन मिळण्यासाठी त्यावेळी शासनाने निश्चित केलेल्या विहीत कालमर्यादेत पर्यायी जमिनीचे निर्धारित भोगवटा मुल्य शासनाकडे भरणा केले आहे, अशा भुधाराकांना तसेच महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम- १९७६ व १९८६ च्या तरतुदीनुसार ज्या भुधारकांनी संपादित जमिनीचा मोबदला प्राप्त झाल्यानंतर पर्यायी जमिन मिळण्यासाठी त्यावेळी शासनाने निश्चित केलेल्या विहीत कालमर्यादेत पर्यायी जमिनीचे निर्धारित भोगवटा मुल्य शासनाकडे भरणा केले आहे अशा शिल्लक पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना पर्यायी जमिनीचे वाटप करतांना त्यांना भोगवटादार वर्ग-१ ची जमीन देण्याची दक्षता सर्व संबंधीतांनी घावी.

६) सदर शासन निर्णयामुळे सन १९७६ व १९८६ च्या पुनर्वसन अधिनियमातील तरतुदीनुसार वाटप करण्यात आलेल्या अथवा असे अधिनियम अस्तित्वात येण्यापूर्वी शासनाच्या तत्कालीन धोरणानुसार पाटबंधारे प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या ज्या भुधारकांनी संपादित जमिनीचा मोबदला प्राप्त झाल्यानंतर पर्यायी जमिन मिळण्यासाठी त्यावेळी शासनाने निश्चित केलेल्या विहीत कालमर्यादेत पर्यायी जमिनीचे निर्धारित भोगवटा मुल्य शासनाकडे भरणा केले आहे, अशा प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-२ संवर्गातून भोगवटादार वर्ग-१ संवर्गात रुपांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत असली तरीही अशा जमिनींच्या हस्तांतरणावर/ वापरातील बदलावर अन्य अधिनियमाव्दारे निर्बंध या शासन निर्णयामुळे शिथील झाल्याचे समजण्यात येऊ नये.

७) सदर शासन निर्णयामुळे सन १९७६ व १९८६ च्या पुनर्वसन अधिनियमातील तरतुदीनुसार वाटप करण्यात आलेल्या अथवा असे अधिनियम अस्तित्वात येण्यापूर्वी शासनाच्या तत्कालीन धोरणानुसार पाटबंधारे प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना त्यांची अनुज्ञेयता व पात्रता तपासुन वाटप करण्यात आलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-२ संवर्गातून भोगवटादार वर्ग-१ संवर्गात रुपांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत असल्यामुळे सदर शासन आदेशाच्या आधारे पाटबंधारे प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेल्या जमिनीचे व्यतीरीक्त ईतर भोगवटादार वर्ग-२ संवर्गातील जमिनींचे रुपांतरण भोगवटादार वर्ग-२ संवर्गात करणे अनुज्ञेय नाही.

८) उपोरक्त नमुद निदेशानुसार शासन निर्णयाच्या दिनांकापासुन दोन महिन्यांच्या कालावधीत कार्यवाही करुन तद्नंतर एक महिन्याच्या कालावधीत त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करण्याची दक्षता सर्व जिल्हाधिका-यांनी घ्यावी. सदर निदेशानुसार कार्यवाही करण्यास दिरंगाई/हलगर्जी केल्याचे आढळल्यास संबंधीत कर्मचारी/अधिकारी यांच्यावर यथास्थिती शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची दक्षता जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांनी घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०७१८१९०१५२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Shivaji P Karwar

Digitally signed by Shivaji P Karwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0dbd15a4cda43063e726a7e4b0f366443319057727eda4431c6e339fb479ef33, cn=Shivaji P Karwar
Date: 2019.03.07 18:21:04 +05'30'

**( शिवाजी पां.कारवार )**
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

**प्रति,**

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
६) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर,
७) सर्व विभागीय आयुक्त,
८) सव जिल्हाधिकारी,
९) सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
१०) सर्व कार्यासन (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) निवड नस्ती, कार्यासन र-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय. मुंबई.